**प्रेसनोट दिनांक- २७/०७/२०१९**
**समर्थ पोलीस स्टेशन पुणे**
**कर्ज वसुलीचे निमित्ताने घरात घुसून महिलेचा विनयभंग करणारे आरोपीस अटक**

रास्ता पेठ,पुणे या भागात रहाणारे एका कुटंबातील प्रमुखाने एका खाजगी फायनान्स कंपनीकडून ८८ लाख रुपयांचे कर्ज घेतलेले होते. त्याचे हफ्ते थकल्याने कर्ज वसुलीसाठी त्यांचा प्रतिनिधी प्रीतम विक्रम काळे,वय—२५,रा.२५१ मंगळवार पेठ,पुणे हे कर्ज वसुलीसाठी कर्जदाराचे घरी गेले होते. तेव्हा कर्जदार हे कामानिमित्त घरास बाहेरुन कडी लावून बाहेर गेलेले होते व त्यांची पत्नी ही एकटी घरात बेडरुम मध्ये झोपलेली होती. तेव्हा आरोपी काळे याने दाराची कडी उघडून अधिकार नसताना घरात प्रवेश करुन,बेडरुम मध्ये झोपलेल्या त्यांचे पत्नीस हात लावून उठवून त्यांना कर्ज रकमेची मागणी करुन त्यांना अपशब्द वापरुन त्यांचा विनयभंग केला,म्हणून कर्जदार यांचे पत्नीचे तक्रारीनुसार गुन्हा रजि.नं.२१६/१९ भादवि.४५१,३५४,५०४ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आला आहे.

नमूद वसुली प्रतिनिधी प्रीतम काळे याचा पोउपनि.शशीकांत शेळके आणि पोना. सुनील घाडगे यांनी तपास करुन त्यास शोधून काढून गुन्हयात अटक केली. अशा रितीने वसुली प्रतिनिधी यास मर्यादाचे उल्लंघन केल्याप्रकरणी कायदेशिर कारवाईस समोर जाणे भाग पडले आहे .